# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोल्हापूर शहरातील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाअंतर्गत कामाचे मुल्यांकन करण्याबाबत

**(१) ८५२५ (०६-०७-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेल्या कामांचे फेरमुल्यांकन करण्यासाठी समिती गठीत करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचा अध्यादेश जारी करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समिती नियुक्त करण्याबाबत विलंबाची कारणे कोणती व समितीची फेरमुल्यांकन अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०१६) :** (१) नाही. कामांचे फेरमुल्यांकन करण्यासाठी समिती दिनांक ०९.०६.२०१४ रोजी गठीत करण्यात आली आहे. डिसेंबर, २०१४ मध्ये कोल्हापूर शहरातील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत आकारण्यात येत असलेल्या पथकराला पर्याय शोधण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

(२) नाही.

(३) प्रकल्पाच्या मुल्यांकनासाठी गठीत केलेल्या समितीचा अहवाल शासनास सादर झाला आहे. त्यानंतर पुन्हा फेरमुल्यांकन समिती गठीत करण्यात आली. याही समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून प्रकल्पाचे मुल्य निश्चित करण्यासाठी सर्व समित्यांच्या अहवालांची सखोल तपासणी करण्यासाठी नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. दिनांक ०१.०१.२०१६ पासून कोल्हापूर शहरातील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाअंतर्गत सुरु असलेले पथकरनाके बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

---

**शिवणी अनुदानित आश्रमशाळा भिसी ता.चिमूर, जि.चंद्रपूर येथील प्राथमिक शिक्षिका येथील यांचे प्रलंबित व नियमित वेतन भत्ते तात्काळ काढण्याबाबत**

**(२) ८६५५ (०९-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कु.व्ही.आर.डहाके, प्राथमिक शिक्षिका, शिवणी अनुदानित आश्रमशाळा भिसी ता.चिमूर, जि.चंद्रपूर यांचे प्रलंबित व नियमित वेतन भत्ते काढण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.आदिवासी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) रिक्त पदे नसल्याने कु.डहाके यांचे पद अतिरिक्त ठरत होते. त्यामुळे वेतन व भत्ते आश्रमशालार्थ प्रणालीनुसार डाटा एंट्री होत नसल्याने वेतन प्रलंबित असल्याचे दिसून येते. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या दिनांक २५.६.२०१५ च्या आदेशानुसार कु.व्ही.आर.डहाके यांना दि. ३.७.२०१५ पासून रुजू करुन घेण्यात आले आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २५.८.२०१५ च्या आदेशानुसार कु.डहाके यांना दिनांक ३.७.२०१५ पासून वेतन व भत्ते प्रदान करण्याबाबत आदेशित करण्यात आले असल्याने जुलै, २०१५ (दिनांक ०३.७.२०१५ रुजू दिनांकापासून) ते एप्रिल, २०१६ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे.

अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे जाने ते जुलै, २०१६ पर्यंतच्या अदा करण्यात आलेल्या वेतनाबाबत आढावा घेवून वेळेवर वेतन अदा न करणाऱ्या मुख्याध्यापक व आहरण व संवितरण अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना दि.३.८.२०१६ च्या शासन पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, सर्व अपर आयुक्त व सर्व प्रकल्प अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

---

**अमरावती जिल्ह्यातील एमआयडीसी नांदगांव पेठ येथे उद्योग सुरु करण्याबाबत**

**(३) १६०६३ (१०-०४-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पंचताराकिंत एम.आय.डी.सी. नांदगाव पेठ या ठिकाणी मोठया प्रमाणात उद्योग धंदे सुरु करण्यासाठी विशेषत: मुंबईतील काही उद्योग धंदे नादंगाव पेठ एम.आय.डि.सी. मध्ये स्थानांतरीत करण्याबाबतची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी काही दिवसापूर्वीच केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच भातकुली तालुक्यात लघु एम.आय.डी.सी. मध्ये जमिन उपलब्ध असून गेल्या कित्येक दिवसापासून संबंधीत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे या ठिकाणी उद्योग उभारण्याची मागणी तसेच ह्या उद्योगातून येथील तालुक्याच्या परिसरातील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळेल अशी मागणी पत्र व्यवहार करुन केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी काय कार्यवाही केली वा करणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) भातकुली लघु उद्योग क्षेत्राकरिता महामंडळाने १५.७८ हे. आरे क्षेत्रात एकूण २७ भूखंडाचे आरेखन केले असून एक भूखंड आय.टी.आय. करिता वाटप करण्यात आला आहे व ५ अर्जदारांना भूखंड वाटपासंबंधीचे देकार पत्र देण्यात आले आहे. तसेच मे.गंगासावित्री सिमेंट प्रा.लि. व मे.जतीन ऑईल मिल यांना अनुक्रमे ४०००० व १६००० चौ.मी. जागेचे देकारपत्र देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत**

**(४) १६३४८ (३१-०७-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) आरक्षणास बाधा न पोहचता शासकीय सेवेत आरक्षण देण्याच्या विचाराधीन बाबीवर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच, शासन निर्णयास होत असलेल्या विलंबामुळे धनगर समाजाने वारंवार आंदोलन केले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-१०-२०१६) :** (१), (२) व (३) धनगर किंवा धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना संशोधन करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार संस्थेकडून सदर संशोधन तीन टप्प्यात करण्यात येणार आहे. त्यापैकी संशोधनाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत (Formative Research) चे काम पुर्ण झाले आहे. उर्वरित टप्प्यातील मुख्य संशोधनाचे भाग-१ व भाग-२ मधील संशोधनाचे काम पुर्ण करुन अंतीम अहवाल माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत शासनास सादर करण्यात येईल. असे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी शासनास कळविले आहे. तदनुसार संस्थेचा अंतीम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील आदिवासींना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत**

**(५) १६७२९ (१०-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, आरे वसाहत, आयआयटी पवई, मनोरी, मढ, गोराई, दहिसह, कांदिवली, मालाड, येथे पिढ्यान पिढ्या वास्तव्य करणा-या आदिवासिंची स्थिती अत्यंत विदारक असून, वीज, पाणी, यासह मूलभूत हक्कासाठी त्यांची दैनावस्था झाल्यामुळे या विरोधात महाराष्ट्र श्रमजीवी संघटनेने संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व) ते मंत्रालय असे भव्य मोर्चाचे आयोजन केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदिवासींना त्यांच्या मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत तसेच त्यांनी मोर्चा केलेल्या मागण्याबाबत शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, त्याची अंमलबजावणी शासनामार्फत करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२३-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) संजय गांधी राष्टीय उद्यान बोरीवली येथे १६ आदिवासी पाड्यात ठक्कर बाप्पा योजनेतंर्गत सन २०१४-१५ मध्ये सौरदिवे बसविण्याचे काम घेण्यात आले असून सदर कामाकरिताचा निधी संबंधित यंत्रणेकडे वर्ग करण्यात आला आहे. आरे दुग्ध वसाहत गोरगाव-मरोशीपाडा, जिवाचापाडा, प्रजापुरपाडज्ञ, खांबाचापाडा, फुटक्यातळीचा पाडा, वनिचापाड, खडकपाड, कोंबडपाडा याठिकाणी शौचालये, समाजमंदिर, रस्ते ही विकास कामे केली आहेत.

आयआयटी पवई मुंबई येथील भांगशिला व पेरुबाग या आदिवासी पाड्यावर पिण्याच्या पाण्याची, शौचालयाची, रस्त्यांची व गटारे यांची सोय आय.आय.टी. प्रशासन पवई मुंबई यांनी केली आहे.

मनोरी, मढ येथील डोंगरीपाडा येथे सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले असून सिमेंट क्रॉक्रिटचा रस्ता बांधण्यात आला आहे. धारीवली (मारुतीपाडा) व कृष्णापाडा येथे सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता बांधण्यात आला आहे.

बोरीवली गोराई येथील बाबर आदिवासी पाडा येथे रस्ता तयार करुन पेव्हर ब्लॉक बसविले आहेत. जामझापाड्यात सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले असून रस्ताही तयार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सौरदिवे बसविणेत आले असून समाजमंदिर बांधण्याचे काम निविदास्तरावर आहे. मुंडापाडा येथे सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता व गटार बांधण्यात आले आहे.

कांदिवली येथील जानुपाडा येथे रस्ते व गटाराचे काम केले असून सांगवाडी येथे बोरवेल द्वारे पाणीपुरवठा करणे व समाजमंदिर बांधणे ही कामे केली आहत. तसेच सुभाष गल्ली येथे सिमेंट कॉक्रिटचा रस्ता व गटार बांधण्यंचे काम निविदा स्तरावर आहे.

मालाड येथील वामनशेठ वाडी येथे सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता करण्यात आला असून पुष्पा पार्क येथे समाजमंदिरचे काम निविदा स्तरावर आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॅरीडॉरमधील इगतपुरी-नाशिक-सिन्नर या औद्योगिक क्षेत्रासाठी लागणारे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) १८२६९ (१७-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॅरीडॉरमधील इगतपुरी-नाशिक-सिन्नर या औद्योगिक क्षेत्रासाठी लागणाऱ्या पाण्याची उपलब्धता नसल्याचे जलसंपदा विभागाने उद्योग विभागाला कळविल्यामुळे या प्रकल्पासंबंधीची कार्यवाही शासनाने स्थगित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक जिल्हयात २३ मोठी धरणे असल्याने नाशिक जिल्हयातील धरणांमधून नाशिकसह अंशत: मुंबई व मराठवाड्यालाही पाणीपुरवठा होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डी.एम.आय.सी.च्या विद्यमान टप्प्यातील नाशिकची स्थगिती उठवून हा प्रकल्प कार्यान्वीत करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) नाशिक येथील प्रस्तावित दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पाकरिता जलसंपदा विभागाकडे गंगापूर व दारणा समूहातून २३.७३ द.ल.घ.मी. इतक्या पाण्याची मागणी करण्यात आली होती. तथापि गंगापूर व दारणा समूहातील ८६% पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षित असल्यामुळे पाणी आरक्षण देता येणार नाही असे जलसंपदा विभागाने कळविले असल्यामुळे दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पाअंतर्गत इगतपूरी-नाशिक-सिन्नर या औद्योगिक क्षेत्राची कार्यवाही तात्पुरती थांबविण्यात आली आहे.
(२) नाशिक जिल्हयातील दारणा, गंगापूर व उर्ध्व गोदावरी समूह तसेच अहमदनगर जिल्हयातील मुळा व प्रवरा समुहातून औरंगाबाद जिल्हयातील जायकवाडी धरणासाठी पाणी सोडण्यात आले आहे. तसेच नंदुरमधमेश्वर बंधाऱ्यातून औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर व वैजापूर तालुक्यांना जलद कालव्याद्वारे पिण्यासाठी व सिंचनसाठी पाणी पुरविण्यात आले आहे.
(३) गंगापूर व दारणा समुहामध्ये पाणी उपलब्ध करुन देणेसाठी राष्ट्रीय जल विकास प्राधिकरणाकडून दमणगंगा खोरे (एकदरे) व वैतरणा खोरे (अप्पर वैतरणा) या दोन आंतरराज्य खोरे जोडणी योजनांच्या व्यवहार्यतेचा (Feasibility Report) अभ्यास करण्यात आला असून त्या अंतर्गत पश्चिम वाहिनी नद्यातील पाणी उपसा करुन गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येणार आहे. या भविष्यकालिन नियोजित वळण योजनांमधून प्रस्तावित मेगा इंडस्ट्रियल पार्कसाठी २३.७३ दलघमी/८३८.०२५ दलघफू पाणी उपलबध होऊ शकेल. राज्य जलनिती नुसार

पाण्याच्या वापराबाबत प्रथम प्राधान्यक्रम पिण्यासाठी, दुसरा प्राधान्यक्रम सिंचनासाठी व औद्योगिक प्रयोजनासाठी तिसरा प्राधान्यक्रम आहे. त्यामुळे दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉरसाठी गोदावरी खोऱ्यातून सद्य:स्थितीत नाशिक जिल्हयातील उपलब्ध पाण्यातून मागणी प्रमाणे पाणी देणे शक्य नाही. तथापि भविष्यात पश्चिम वाहिनी वळण योजनेचे पाणी उपलब्ध झाल्यास त्यावेळची परिस्थिती पाहून पाणी देणे शक्य होईल असे जलसंपदा विभागाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयात औद्योगिकीकरणासाठी शेतक-यांकडून घेण्यात आलेल्या जमिनी त्यांना परत करण्याबाबत**

**(७) १९८२३ (३१-०७-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात औद्योगिकीकरणासाठी हजारो एकर जमिन शेतकऱ्यांकडून घेण्यात आल्या होत्या त्यातील काही जमिन पडून आहेत त्या जमिनी संबंधित शेतकऱ्यांना परत कराव्यात अशी मागणी माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास जिल्हा प्रशासनाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार सदर शेतकऱ्यांना जमिनी परत करण्यांसदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

वर्धा येथील माजी लोकप्रतिनिधींनी दिनांक ९/२/२०१५ च्या पत्रान्वये जमिनी संबंधित शेतकऱ्यांना परत करण्याबाबत मागणी केली होती.

(२) दिनांक १०/१०/१९७३ च्या शासन निर्णयानुसार संबंधित शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाई रकमेच्या दुप्पट होणार नाही अशी चालू बाजारभावाप्रमाणे होणारी रक्कम संबंधित शेतकऱ्यांकडून वसूल करुन जमीन मूळ मालकास परत देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. परंतु केरळ राज्य विरुध्द एम.भास्करन पिलाई या मा.सर्वोच्च न्यायालयातील दावा क्रमांक ३६२८/१९९७ च्या अनुषंगाने दिलेल्या निर्णयानुसार संपादित केलेली जमीन मुळ मालकांना परत न देता जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी असा निर्णय दिलेला असल्याने संपादित केलेली जमीन परत करता येणार नाही. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेले संपादित केलेली जमीन परत करण्याचे अधिकार महसूल व वन विभागाच्या दिनांक २२/८/२००२ अन्वये काढून घेण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर धेरंड (ता.अलिबाग, जि.रायगड) गावाजवळ टाटा पॉवर कंपनीने संपादनाच्या वेळी करण्यात आलेल्या करारानुसार कोणत्याही अटी व शर्तींची पुर्तता केली नसल्याबाबत**

**(८) २१३५१ (०६-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर धेरंड (ता.अलिबाग, जि.रायगड) गावाजवळ टाटा पॉवर कंपनीने नियोजित प्रकल्पासाठी बाजर भावाने खरेदी केलेल्या जमिनीच्या प्रकल्पग्रस्त लाभार्थी शेतकऱ्यांना मान्य केलेल्या पॅकेजमधील अन्य सुधारणा लवकरात लवकर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, जमिन संपादनाच्या वेळी करण्यात आलेल्या करारानुसार कोणत्याही अटी व शर्तींची पुर्तता कंपनी मार्फत केली नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्त लाभार्थी शेतकऱ्यांना प्रकल्पासाठी जमिन संपादनाच्या वेळी केलेल्या करारातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यासाठी शासनाने चौकशी करुन कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही. तथापि, श्री.किशोर विश्वनाथ पाटील व इतर, रा.शहापूर यांनी दिनांक २४/२/२०१५ रोजी जिल्हाधिकारी, रायगड यांना त्यांच्या जमिनी टाटा कंपनीला विकल्या आहेत त्यावेळी टाटा कंपनीला खाडीला लागून असलेले बाहेरील काठाचे बांध बंदीस्ती करण्यास सांगितले होते. परंतु कंपनीने अद्यापपर्यंत बांध बंदिस्ती केलेली नाही त्यामुळे आपण स्वत: लक्ष घालावे. तसेच कंपनीने ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेतल्या आहेत त्यांच्या मुलाना नोकरीत सामावून घ्यावे असे निवेदन दिले आहे.

(२) टाटा कंपनीने जमिन संपादनाच्या वेळी केलेल्या करारनाम्यानुसरर अटी व शर्तीची पूर्तता केली नसल्यासंबंधी कोणतीही तक्रार ग्रामस्थांकडून प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठेकेदारांकडून अपघात ग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा**

**(९) २३२९९ (३१-०७-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांगले रस्ते हा नागरिकांचा मुलभूत अधिकार असल्याचा निकाल मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदोष, निकृष्ट, अपूर्ण रस्त्यामुळे नागरीकांचा अपघात झाल्यास संबंधित ठेकेदारांकडून अपघात ग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अपघातात जखमीना मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेत आहे,

(४) नसल्यास, विलंबास कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. ७.५.२०१५ रोजी याबाबत निकाल दिलेला आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी कंपन्यामध्ये तांत्रिक कर्मचारी ६५ टक्के आणि अतांत्रिक कर्मचारी ८० टक्के भरती करण्याबाबत**

**(१०) ३२७०४ (२१-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी कंपन्यामध्ये तांत्रिक कर्मचारी ६५ टक्के आणि अतांत्रिक कर्मचारी ८० टक्के भरती करण्याचे शासनाचे आदेश आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कन्नड (जिल्हा औरंगाबाद) येथील बारामती ॲग्रो लि.या कंपनीमध्ये शासकीय निकषानुसार कामगारांची भरती होत नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीमध्ये शासनाच्या नियमानुसार कामगारांची भरती होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील औद्योगिक आस्थापनांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत ५० टक्के व पर्यवेक्षकीयसहित इतर श्रेणीत ८० टक्के स्थानिक लोकांचे प्रमाण शासन निर्णय दि.१७/११/२००८ नुसार राखण्याचे निर्देश आहेत.

(२) होय.

(३) जिल्हाधिकारी, औरंगाबाद व जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांच्या अहवालाप्रमाणे सदर कंपनीमध्ये स्थानिक रोजगाराचे प्रमाण शासन निर्णय १७/११/२००८ नुसार राखण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाल्मिकी मेहतर समाजाला सामाजिक आणि आर्थिक संरक्षण देण्याबाबत

**(११) ३२८२९ (१८-०१-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने वाल्मिकी मेहतर समाजाला सामाजिक आणि आर्थिक संरक्षण देण्यासाठी सफाई कामगारांच्या नियुक्ती मध्ये वारसा पध्दत कायम ठेवण्याबाबत अनुसुचित जातीमधील इतर सफाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईकांना वारसा हक्काने नोकरी देण्याचा निर्णय राज्य सरकारने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाई कामगारांना मुंबईत घरे मिळावीत अशी त्यांची अनेक वर्षापूर्वीपासनूची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणते धोरण ठरविले आहे, अथवा ठरविण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१२-०८-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

वाल्मिकी मेहतर समाजाला सामाजिक आणि आर्थिक संरक्षण देण्यासाठी सफाई कामगारांच्या नियुक्ती मध्ये वारसा पध्दत पुढे चालू ठेवण्याचा तसेच अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारस किंवा नातेवाईकांना वारसा हक्क योजनेचा लाभ देण्याचा निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(२) होय.

(३) महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती यांच्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या सध्याच्या सेवानिवासस्थानांच्या ठिकाणी, सफाई कर्मचाऱ्यांची सेवानिवासस्थाने तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेच्या निकषानुसार मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी ४.०० या कमाल चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी ५०% सदनिका सेवानिवासस्थाने म्हणून व उर्वरित ५०% सदनिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय नगर विकास विभागामार्फत दि.१२.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जात पडताळणी समित्यांकडून वेळेवर जात वैधता प्रमाणपत्रे दिली जात नसल्याबाबत

**(१२) ३३९६२ (१८-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती, जमाती, भटके, विमुक्ती व इतर मागासवर्गीय समाजातील मुलामुलांना शाळा-महाविद्यालयांमधील प्रवेश व शासकीय सेवेत निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे अर्ज सादर केल्यानंतर त्यावर एक महिन्यांच्या आत

निर्णय घेण्याचे आदेश मा.समाजकल्याण राज्यमंत्री यांनी विधानपरिषदेत पावसाळी अधिवेशन, २०१५ मध्ये दिलेले असतांनाही अद्यापही जात पडताळणी समित्यांकडून वेळेवर जात वैधता प्रामणपत्रे दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने आता कोणती कार्यवाही केली आहे वा कार्यवाही करत आहे,

(३) तसेच या समितीकडून दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जातपडताळणी नियम २०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही. सदर नियमानुसार जातपडताळणी समितीस जातवैधतेबाबतचा निर्णय ३ महिन्यांच्या अवधीत व अपवादात्मक परिस्थितीत २ महिन्याच्या जास्तीच्या कालावधीत देणे बंधनकारक आहे. तथापि, संबंधित जातपडताळणी प्रस्तावामध्ये कागदपत्रांची कमतरता, अपुरे पुरावे यामुळे संबंधित व्यक्तींकडून पत्रव्यवहार करुन आवश्यक ते पुरावे मागवावे लागतात. शंकास्पद प्रकरणामध्ये पोलीस दक्षता पथकाकडून चौकशी केली जाते. त्यामुळे प्रकरणे निकाली काढण्यास उशीर होतो.

(२) वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात येत आहे.

(३) दिरंगाई होत नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जात पडताळणी विभागीय कार्यालयामध्ये जात पडताळणीची ९ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) ३५३१२ (२३-१२-२०१५). श्री.धनंजय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जात पडताळणी विभागीय कार्यालयामध्ये जात पडताळणीची ९ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबतची माहिती माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक दिवसापासून या जात पडताळणी समितीस पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्य मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे हजारो विद्यार्थी व नोकरदारांना यामुळे प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

प्रलंबित प्रकरणांची संख्या व अपुरा कर्मचारीवर्ग यांचा समन्वय साधून तसेच अतिरिक्त कार्यभार देऊन व वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात येत आहे.

(४) संबंधित समितीस नियमित उपायुक्त तथा सदस्य नियुक्त करण्यात आले असून अन्य रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच सद्य:स्थितीमध्ये राज्यात १५ विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत आहेत. या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचा कामाचा व्याप विचारात घेऊन समित्यांचे कामकाज प्रभावीपणे व्हावे याकरिता दि.२/३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र समिती कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्यात केंद्र सरकार कडून सन १९६४ व १९७१ या कालावधीतील बंगाली समाजाच्या आरक्षण मिळणेबाबत

**(१४) ३७८४० (२३-१२-२०१५). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकार कडून सन १९६४ व १९७१ या कालावधीतील महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, ईत्यादी जिल्ह्यात बंगाली समाजाला पुनर्वसन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजाती म्हणून नमोशुद्र, पौन्द्र, क्षत्रिय, राजवंशी, परमानिक आदी उपजातीला भारतात प.बंगाल, उडीसा, मिझोराम, त्रिपुरा, मणिपूर, आसाम, उत्तरप्रदेश व मेघालय या राज्यात पुनर्वसन झालेल्या या समाजाला अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रात सुद्धा सन १९८१ पर्यंत सदर सवलत मिळत होती, हे खरे आहे काय,

(४) या बाबत शासनाची भूमिका काय व अंमलबजावणीबाबत उपाययोजना काय केल्या आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :** (१) चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात सदर समाजाला पुनर्वसन देण्यात आले आहे.

(२) प्रत्येक राज्याची अनुसूचित जातीची यादी भिन्न असल्यामुळे एखाद्या विशिष्ट जातीचा प्रवर्ग वेगवेगळ्या राज्यात भिन्न असू शकतो. त्या-त्या राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीनुसार संबंधित जातीच्या व्यक्तीस जातप्रमाणपत्र देण्यात येते. महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीमध्ये सदर प्रश्नात नमूद केलेल्या जातींचा समावेश नाही.

(३) हे खरे आहे.

(४) जातपडताळणी नियम-२०१२ नुसार महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीत समाविष्ट असलेल्या व दि.१०/८/१९५० पूर्वीपासून महाराष्ट्रात कायमस्वरुपी वास्तव्यास असलेल्या सदर प्रवर्गातील सर्व जातीच्या व्यक्तींना अनुसूचित जातीसाठी असलेले सर्व प्रकारचे आरक्षणाचे फायदे अनुज्ञेय आहेत.

---

**गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील झाड्या किंवा**
**झाडीया समाजाला आरक्षण मिळण्याबाबत**

**(१५) ३७९१६ (२३-१२-२०१५). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात झाड्या व झाडीया समाज स्वातंत्र्यापूर्वी पासूनच मोठ्या प्रमाणावर राहत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची बोली भाषा व चालीरीती स्वतंत्र आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांना कोणत्या प्रकारच्या जातीचे प्रमाणपत्र व आरक्षण दिले जात आहे,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीमध्ये ज्या जातींचा समावेश आहे. केवळ त्याच जाती समाजाच्या लोकांना मागासवर्गीयांचे जातप्रमाणपत्र देण्यात येते व त्या-त्या प्रवर्गानुसार आरक्षणाचे लाभ देण्यात येतात. झाडया व झाडीया या जातींचा राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीमधील कोणत्याही प्रवर्गात समावेश नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिकच्या विभागीय जातपडताळणी समितीच्या मनमानी कारभाराबाबत**

**(१६) ३८११५ (२३-१२-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकच्या विभागीय जातपडताळणी समितीच्या मनमानी कारभारामुळे डिप्लोमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या नाशिक, नगर जिल्हयातील विद्यार्थ्यांचे जातपडताळणी प्रस्ताव काही दिवसांपासून स्वीकारले जात नसून दोन्ही जिल्हयात किमान २ हजार ५०० विद्यार्थ्यांना माघारी पाठविले असल्याची धक्कादायक माहिती ऑक्टोबर २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिस-या वर्षाला शिक्षण सुरु असताना प्रस्ताव घेण्यात येईल असे सांगून सदरहू प्रस्ताव दाखल करण्याकरिता ५०० रुपये इतकी मनमानी पद्धतीने फी विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात जातपडताळणीच्या एकूण किती समित्या आहेत व त्यात साधारणतः किती प्रकरणे दाखल होतात,
(४) असल्यास, या समितीद्वारे घेतल्या जाणा-या फी पोटी किती रक्कम शासनाकडे जमा होते,
(५) राज्यातील अन्य समित्या पहिल्या वर्षासह तीस-या वर्षाचेही प्रस्ताव दाखल करून घेत असल्यामुळे हीच समिती चुकीचे निर्णय घेत असल्याचे निदर्शनास आल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासन विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत नाशिक समितीकडे पदविका, पदवी विद्यार्थ्यांचे सर्व वर्षाचे जातप्रमाणपत्र पडताळणीकरिताचे प्रस्ताव स्विकारण्यात येऊन त्यावर विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.

शैक्षणिक जातपडताळणी प्रस्ताव दाखल करण्याबाबत विशिष्ट बंध नसून सदर प्रकरणी रु.१००/- इतकी फी आकारली जाते व त्याची पावती विद्यार्थ्यांना दिली जाते.
(३) सद्य:स्थितीत राज्यात १५ विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत असून त्यांच्याकडे साधारणत: दरमहा सरासरी ३५ ते ४० हजार प्रकरणे दाखल होतात.
(४) प्रति समितीकडे दरमहा रुपये १.५० ते १.७५ लाख रक्कम जमा होते.
(५) हे खरे नाही.

जातपडताळणी नियम २०१२ नुसार जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमार्फत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गामधील उमेदवारांचे शैक्षणिक, सेवा विषयक व निवडणूक या बाबींकरिता जातपडताळणीचे कामकाज विहित कालमर्यादेत करण्यात येत असल्यामुळे कुठल्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही.
(६) वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात येत आहे.

---

**अमरावती जिल्हयातील चांदूर येथे विद्यार्थ्यांची जातपडताळणी कागदपत्रे परत देताना विद्यार्थ्यांना नाहक त्रास देत असलेबाबत**

**(१७) ३८७१० (१८-०१-२०१६). श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे येथे विद्यार्थ्यांची जातपडताळणी कागदपत्रे परत

देताना जातपडताळणी कार्यालयाचे लिपीक अनेक दिवस वाट पहायला लावून विद्यार्थ्यांना नाहक त्रास देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील विद्यार्थ्यांना निर्धारित वेळेत जातपडताळणी कागदपत्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६)** :(१) हे खरे नाही.

संबंधित समितीकडे विशेष मागास प्रवर्ग-अ व शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासप्रवर्ग या दोन नविन प्रवर्गातील अनुक्रमे मुस्लीम व मराठा जातीतील विद्यार्थ्यांचे जातपडताळणीकरिता अर्ज आले होते. दोन्ही प्रवर्गाच्या बाबी न्यायप्रविष्ठ असल्याने सदर अर्ज न्यायनिर्णयाच्या प्रतिक्षेने प्रलंबित ठेवण्यात आले होते. परंतु मा.उच्च न्यायालयाकडून याबाबतीत कोणताही निर्णय न झाल्याने सदर सर्व अर्ज संबंधितांस परत करण्यात आले आहेत.

तसेच एका विद्यार्थ्याने त्याचा अर्ज तपासणीकरिता पात्र नसल्याने परत करावा असा अर्ज केल्यामुळे त्याच्या विनंतीवरुन त्याचा जातपडताळणी प्रस्ताव तात्काळ परत करण्यात आलेला आहे.

(२) परत करण्यात आलेला जातपडताळणी अर्ज तपासणीस अपात्र असल्याने शैक्षणिक नुकसानीचा प्रश्न उद्‌भवत नसल्याने याबाबत शासनाने चौकशी किंवा अन्य कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सन २००१-२०२१ या रस्ते विकास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(१८) ३९३९५ (१३-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दर वीस वर्षांनी रस्ते विकास योजना तयार केली जात असून सन १९८१-२००१ नंतर सन २००१-२०२१ हि रस्ते विकास योजना आखण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ करिता राज्यातील किती कि.मी. रस्ते विकसित करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी किती रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे आणि किती कि.मी. रस्त्यांच्या विकासाचे उद्दीष्ट साध्य झाले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१६)** :(१) होय. दिनांक २४/०४/२०१२ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेस मंजुरी देण्यात आली आहे.

(२) ३,३६,९९४ कि.मी रस्ते विकसित करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

(३) सदर योजनेस सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ११,२५,७६०.०० लक्ष रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे तसेच दि. ३१/०३/२०१४ पर्यंत २,६३,७०८ कि.मी. रस्ते विकासाचे उद्दीष्ट साध्य करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्हयातील कल्याण तालुक्यातील अनेक जिल्हा सहकारी संस्थांची नोंदणी रद्दचे आदेश बजावले असल्याबाबत

**(१९) ४०७६१ (२७-०४-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जि.ठाणे, कल्याण तालुक्यातील राज्य शासनाच्या सहकार आयुक्तालयाच्या आदेशाने ठाणे जिल्हा संस्था निबंधक डोंबिवली विभागीय कार्यालय परिक्षेत्रात नोंदणीकृत २६६ सहकारी संस्थाना दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निबंधकांनी कलम २१ अंतर्गत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,राज्य शासनाच्या आयुक्तालयाच्या, आदेशान्वये ठाणे जिल्हयातील उपनिबंधक डोंबिवली विभागीय कार्यालयाच्या परिक्षेत्रातील सहकारी संस्थाच्या करण्यात आलेल्या सर्वेक्षणात २६० संस्था बंद असल्याची माहिती मिळाल्याने सदर संस्थांची नोंदणी रद्द करण्याची कारवाई जानेवारी, २०१६ च्या सुमारास करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थांचा बँकेचा व्यवहार पूर्ण नसणे, संचालक मंडळाच्या सभा, लेख परीक्षण, अहवाल यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केलेल्या सर्वेक्षणात कोणकोणत्या बाबी निदर्शनास आल्या, संस्था नोंदणी करताना सादर करण्यात आलेले पुरावे उपनिबंधकाचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी जागेवर जावून तपासणी करण्यात आले होते काय,

(५) असल्यास, संस्थेची नोंदणी करताना उपनिबंधकाच्या कार्यालयाने सर्व बाबी दुर्लक्षित करुन संस्थेची नोंदणी केली, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नोंदणी रद्द केलेली नाही.

बंद आढळून आलेल्या २६६ संस्थांना अधिनियम १९६० चे कलम २१ अन्वये त्यांची नोंदणी रद्द का करण्यात येवू नये ? याबाबत दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रात जाहीर नोटीस देण्यात आलेली आहे.

(३) व (४) संस्थांची नोंदणी रद्द केलेली नाही. तथापि, सदर संस्थांच्या नोंदणीकृत पत्त्यावर जावून केलेल्या सर्वेक्षणात लेखापरिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवाल, वार्षिक सर्वसाधारण सभा, संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूक, अनिवार्य विवरण पत्र, उपविधी स्विकृती इ. बाबतची कायदेशीर पूर्तता केली नसल्याचे आढळून आले आहे.

(५) नाही, हे खरे नाही.

(६) लागू नाही.

---

**खामगाव (जि. बुलडाणा) येथील महाराणा केबल नेटवर्क खामगाव यांनी अवैध कनेक्शनचे जाळे पसरविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत अनधिकृतपणे सिमेंटचे खांब उभारल्याबाबत**

**(२०) ४१४७३ (२९-०४-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव परिसरात महाराणा केबल नेटवर्कचे प्रचंड जाळे पसरले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगाव -जलंब-माटरगाव रस्ता, खामगाव - पिंपळगाव राजा रस्ता, खामगाव ते बुलडाणा रस्ता, खामगाव ते शेगाव रस्ता व खामगाव ते चिखली रस्ता, खामगाव ते आंबेटाकळी, खामगाव ते शेलोडी या सर्व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांच्याकडेला सिमेंट पोल अनधिकृतपणे तसेच विनापरवाना टाकले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत त्यांच्याकडून दंड वसुल करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) खामगांव अंतर्गत, १) खामगाव-जलंब-माटरगाव रस्ता, २) खामगाव-पिंपळगाव राजा रस्ता, ३) खामगाव ते बुलडाणा रस्ता, ४) खामगाव ते शेगाव रस्ता, या ठिकाणी सिमेंट पोल टाकण्यात आले होते ते पूर्ण हटविण्यात आले आहेत.

(५) बुलडाणा विभागाअंतर्गत खामगाव उंद्री अमडापूर (खामगांव ते चिखली) रा.मा.क्र. २२२ या रस्त्याच्या कडेला सिमेंट पोल उभारुन त्यावर टि व्ही केबल टाकण्याच्या विनंतीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियम व अटी नुसार तीन वर्षाच्या कालावधीकरिता कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, खामगांव यांनी परवानगी दिली आहे.६) खामगाव ते आंबेटाकळी या रस्त्यावर जिल्हाधिकारी, यांच्या सल्ल्याने कार्यकारी अभियंता यांनी परवानगी दिलेली आहे ७) जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग यांचे अखत्यारितील खामगाव ते शेलोडी या रस्त्याच्या हद्दीत केबल टाकण्यात आलेले नाहीत.

(३) विभागांतर्गत खामगाव-जलंब-माटरगाव रस्ता, खामगाव-पिंपळगाव राजा रस्ता, खामगाव ते बुलडाणा रस्ता, खामगाव ते शेगाव रस्ता या चारही रस्त्यावरील हद्दीतून केबल व सर्व अनधिकृत खांब पूर्णपणे हटविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यातील वडजाई, सौंदाणे, बाभुळवाडी गावातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२१) ४१५६५ (०५-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील वडजाई, सौंदाणे, बाभुळवाडी गावातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने परिसरातील नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित रस्त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी जास्तीचा निधी मंजूरीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) सदरील तीनही गावे ही धुळे अंचाळे या प्र.जि.मा. २७ रस्त्यावरील असून वडजाई, सौंदाणे व बाभुळवाडी या गावातील रस्त्याची लांबी खड्डे विरहीत आहे. या रस्त्यावर नाबार्ड-२० अंतर्गत रु.६३.५८ लक्ष रकमेचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठा आरक्षणासंदर्भात संनियंत्रण करण्यासाठी मा. शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने स्थापन केलेल्या समितीबाबत**

**(२२) ४२२५१ (२८-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा आरक्षणासंदर्भात संनियंत्रण करण्यासाठी मा. शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने स्थापन केलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री.राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :** (१) मराठा आरक्षणासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगितीच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याकरिता करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे व इतर अनुषंगिक कार्यवाहीचे संनियंत्रण करण्यासाठी मा.मंत्री, शालेय

शिक्षण व उच्च तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. त्यामुळे सदर समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) मराठा समाजास आरक्षण देण्याबाबतच्या अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**उमरी तालुक्यातील (जि. औरंगाबाद) बोथी, तुराटी ते सावरगांवफाटावरील उमरी ते तुराटी रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२३) ४२७७१ (२१-०४-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरी तालुक्यातील (जि. औरंगाबाद) महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशाच्या सिमेवर बसलेल्या बोथी, तुराटी ते सावरगांवफाटा पर्यत मागील ६८ वर्षापासून अद्यापर्यंत उमरी ते तुराटी या १७ किमी रस्त्यांचे काम झाले नसून या तिन्ही गांवातून डांबरी रस्ते करण्यात यावेत याकरिता दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी उमरी तहसिल कार्यालयासमोर एक दिवसाचे उपोषण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गांवात मौलव्यान वनसंपदा असून यामुळे वनविभागाला लाखोंचा फायदा मिळतो असे असूनही या गावाच्या प्राथमिक सोयीकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०७-२०१६) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) विषयाधीन रस्त्यावर मार्च, २०१६ च्या अर्थसंकल्पामध्ये, एक काम रु.६०.०० लक्ष किंमतीस, दोन कामे रु.६.०० लक्ष किंमतीस व एक काम रु.१५.० लक्ष किंमतीस मंजूर आहेत. कामाच्या अग्रकमानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत रस्ता वाहतूकीस योग्य असून रस्त्यावरुन वाहतूक चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १ लाख शेतकऱ्यांनी हद्दीबाहेरील सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्याबाबत**

**(२४) ४४०३४ (२८-०४-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील**

**(वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ लाख शेतकऱ्यांनी हद्दीबाहेरील सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्याच प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ ठेवण्यात आला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तथापि, हद्दीबाहेरील सावकारी कर्ज माफी न देण्याचा निर्णय शासनाने घेतला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हद्दीबाहेरील सावकारी कर्ज माफी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ नुसार परवानाधारक सावकारांचे कार्यक्षेत्र वाढविण्याबाबचा प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडून शासनास सादर करण्यात आला असून त्यानुसार शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक भास्करराव घाटे हे सोलापूर जिल्ह्यात २०१२ ते २०१४ या काळात सहाय्यक आयुक्त असतांना, कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याबाबत

**(२५) ४४४३४ (२८-०४-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २६ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक भास्करराव घाटे हे सांगली येथे संविधान दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून खात्यातर्फे विविध उपक्रमांत सहभागी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात २०१२ ते २०१४ या काळात दिपक भास्करराव घाटे हे सहाय्यक आयुक्त असताना, कोट्यवधी रुपयांच्या अपहार प्रकरणी घाटे यांचेविरुध्द गुन्हा दाखल होऊन, सोलापूर पोलीसांना घाटे हे सापडत नसल्याने त्यांना फरारी गुन्हेगार म्हणून जाहीर केलेले असताना ते अधिकारी सांगली मध्ये पदभार स्विकारतात, या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, माहिती अधिकारी शिक्षण समितीचे अध्यक्ष शाहीन शेख व सचिव ॲड.दत्तात्रय जाधव यांनी दिपक भास्करराव घाटे यांच्याविरोधात सांगलीच्या लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार केली आहे, त्याबाबतचा तपास सुरु करण्यात आला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत,

(४) नसल्यास, विलबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, सोलापूर अंतर्गत शिष्यवृत्ती वाटपामधील अनियमिततेप्रकरणी दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलीसांकडून तपास करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी श्री.दिपक घाटे यांना मुंबई उच्च न्यायालयाने दि.२३.११.२०१५ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केलेला होता. तद् नंतर ते दि.२४.११.२०१५ ते दि.२७.११.२०१५ या कालावधीमध्ये कार्यालयामध्ये उपस्थित होते.
(३) सदरच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या समाजाच्या तांडा व वस्त्यांचा सर्व्हे करुन अहवाल सादर करण्याबाबत**

**(२६) ४४५९३ (२८-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या समाजाच्या तांडा व वस्त्यांचा सर्व्हे करुन सन जानेवारी, २०१५ मध्ये अहवाल सादर करण्याबाबत समाजकल्याण विभागाच्या उपायुक्तांनी सर्व तालुक्याच्या गटविकास अधिकाऱ्यांना लेखी सूचना दिल्या होत्या हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सूचनेला आज एक वर्ष पूर्ण होऊनही अद्यापी कोणताच सर्व्हे झाला नसल्यामुळे वस्त्यांचा विकास रखडला आहे हे खरे आहे काय,
(३) नसल्यास, सदर सूचनेनुसार आतापर्यंत किती तालुक्यांचा सर्व्हे करण्यात आला आहे व किती तालुक्यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे,
(४) असल्यास, उक्त अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२५-०७-२०१६) :**(१) होय, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सिंधुदुर्ग व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांच्या मार्फत सर्व गट विकास अधिकारी यांना लेखी सूचना देण्यात आल्या होत्या.
(२) नाही,

सद्यस्थितीला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ८ तालुक्यातील तांडा वस्त्यांचा सर्व्हे पूर्ण झालेला आहे.
(३) जिल्ह्यातील ८ तालुक्यांचा सर्व्हे तयार करण्यात आला असून त्यांचा बृहत आराखडा शासनास प्राप्त झाला आहे.
(४) सदर अहवालामध्ये पायाभूत सुविधा (रस्ते, पिण्याचे पाणी, विद्युतीकरण करणे, सेवाभवन इत्यादी) याबाबत आहे.

(५) कोणत्याही तालुक्याकडून विकास कामाचे परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाले नसल्याने कामास सुरुवात झाली नाही.

---

**लिंगायत समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ स्थापनेबाबत**

**(२७) ४४७३१ (२८-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर लिंगायत समाजाच्या, आर्थिक उन्नतीसाठी, महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची शासन निर्मिती करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या निर्मितीसाठी लोकप्रतिनिधींनी व समाजाच्या विविध संघटनांनी व लोक प्रतिनिधींनी सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाच्या निर्मितीसाठी शासनाने काणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१२-०८-२०१६) :**(१) नाही.

(२) होय.

(३) व (४) लिंगायत समाज विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गात येत असून विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थींना स्वयंरोजगारासाठी व त्यांच्या विकासासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकडून अर्थसहाय्य करण्यात येते. तसेच, प्रत्येक जात व उप जातीसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करुन शासनावरील आर्थिक भार वाढविणे संयुक्तिक होणार नसल्याने, लिंगायत समाजाकरिता स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करणे शक्य होत नाही.

---

**आकोट तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेचे बनावट लाभार्थी आढळून आले त्याबाबत**

**(२८) ४५१९० (२८-०४-२०१६). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट तालुक्यात तहसिल कार्यालयामार्फत राबविल्या जात असलेल्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेत बोगस लाभार्थी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचा निधी विनाकारण वाया जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणात उपविभागीय अधिकाऱ्यांनी तहसिल कार्यालय, आकोट यांना ही सर्व माहिती संकलित करुन जमा करण्याचे व तपासणीमध्ये सहकार्य न करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, आतापर्यंत किती जणांवर कारवाई करण्यात आली,
(५) असल्यास, भविष्यात अशा घटना घडू नये याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१६) :**(१) होय.
(२) अपात्र लाभार्थ्यांचा लाभ बंद करण्यात आला असून संबंधीत अपात्र लाभार्थ्यांना वितरीत झालेली रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(३) होय.
(४) या प्रकरणी दोषी आढळलेले अव्वल कारकून यांचेविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.
(५) विहीत निकषात बसणारे अर्ज स्विकारण्यात येत असून वर्षातून एकदा लाभार्थ्यांचे सामाजिक सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

---

**शासकीय समित्यांवर अध्यक्ष, अशासकीय सदस्यांच्या नेमणुका न झाल्याबाबत**

**(२९) ४५५३६ (२८-०४-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या निराधारांना तत्काळ न्याय मिळण्यासाठी वर्षभरात किमान आठ बैठका सक्तीच्या करण्यात आल्या असताना शासकीय समित्यांवर अध्यक्ष, अशासकीय सदस्यांच्या नेमणुका न झाल्याने अर्जदारांना शासनाचे उंबरठे झिजवावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय समित्यांवर अध्यक्ष व अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी शासनामार्फत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१६) :** (१) नाही.
नियमित संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे गठन संबंधीत जिल्ह्याच्या मा. पालकमंत्री महोदयाच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी करतात परंतु, नियमित संजय गांधी समिती गठीत झाली नसेल अशा वेळी विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त अर्जदाराचे अर्ज मंजुर/नामंजूर करण्याचे अधिकार संबंधीत तहसिलदार यांना दि. ०५.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले असून, त्यानुसार कार्यवाही करण्यात येते,

(२) संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे गठन करण्यानुषंगाने अध्यक्षांच्या व सदस्यांच्या नावाची शिफारस करण्याकरिता मा. पालकमंत्री महोदयांना शासनस्तरावरुन अवगत करण्यात आले असून जिल्हाधिकारी स्तरावरुन सुध्दा मा. पालकमंत्री महोदयांना अध्यक्ष व सदस्यांची नावे कळविण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कानोडी/कानडी जातीसमुहाचा इतर मागास वर्ग संवर्गात समावेश करणेबाबत**

**(३०) ४५६२३ (२८-०४-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कानोडी/कानडी जातीसमुहाचा "इतर मागास वर्ग" संवर्गात समावेश करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांना सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदानावर काय कार्यवाही करण्यात येईल,
(३) कानोडा/कानडी जातीसमुहाचा "इतर मागास वर्ग" सवर्गात समावेश करण्याबाबत शासनाकडून निर्णय घेण्यात येईल काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :**(१) अभिलेखात शोध घेतला असता सदर पत्र आढळून आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृष्णा वृंदावन प्रतिष्ठान अंबरनाथ (जि.ठाणे) संचलित विदयामंदिर व माध्यमिक आश्रमशाळा दिंडोरी (जि.नाशिक) या संस्थेच्या मनमानी कारभाराबाबत**

**(३१) ४६१०८ (२९-०४-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा वृंदावन प्रतिष्ठान अंबरनाथ (जि.ठाणे) संचलित विदयामंदिर व माध्यमिक आश्रमशाळा दिंडोरी (जि.नाशिक) या संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी संस्थेचे संस्थापक व मुख्याध्यापक यांच्या मनमानी कारभाराबाबत तक्रार केलेली असून याकडे दुर्लक्ष होत असल्याचे कारणास्तव दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यालयासमोर उपोषण केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीची दखल शासनाने घेतली आहे काय,
(३) असल्यास, या संस्थेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२५-०७-२०१६) :**(१) दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी उपोषण केले हे खरे आहे.

(२) होय.

(३) संस्था व कर्मचारी प्रतिनिधी व स्वाभिमांनी शिक्षक व शिक्षकेत्तर परिषदेसोबत अपर आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १५.१०.२०१५ रोजी मुद्देनिहाय चर्चा करुन प्रश्न मार्गी लावणेबाबत संस्थेस कळविले.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही झाल्याने संस्थेवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील खाजगी सावकार सामान्य माणसाच्या कमकुवतपणाचा फायदा घेत असल्याबाबत**

**(३२) ४६३१८ (२७-०४-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सावकारी पाशाने अनेक जणांचे संसार मोडण्याची वेळ आली असून सामान्य माणसाच्या कमकुवतपणाचा फायदा खाजगी सावकार घेत असल्याची प्रकरणे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतच्या तक्रारी पोलीसात करुनही कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सावकाराच्या अतिरेकी वसुलीमुळे तसेच त्रासाला कंटाळून पोलीस दलातील एका कर्मचाऱ्याने इचलकरंजीत आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे का,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१६) :** (१) नाही.

सहायक निबंधक, सहकारी संस्था, भूदरगड कार्यालयास याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, सदर प्रकरणी प्रभारी अधिकारी तथा पोलीस उपनिरिक्षक, भूदरगड पोलीस ठाणे यांच्याकडे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ३९, ४५, ४६ प्रमाणे फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी विरुध्द मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांच्याकडे दोषारोप पत्र दाखल केले असून सदरचा गुन्हा अद्याप न्यायप्रविष्ठ आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पोलिस दलातील मयत प्रकरणात झालेल्या तपासामध्ये सावकारांकडून मयत इसमाने पैसे घेतल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**क्रांतीवरी लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनास सादर केलेल्या शिफारशी मान्य करण्याबाबत**

**(३३) ४६७८७ (२८-०४-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये क्रांतीवर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनास सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशींपैकी आरक्षणविषयक शिफारशीसह उर्वरित १४ शिफारशी अमान्य करण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमान्य करण्यात आलेल्या आरक्षणसह शिफारशी मान्य करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, विभागाकडून शिफारसींची अंमलबजावणी अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मातंग समाजातील किती लोकांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) या विभागाच्या दि.३१/१२/२०११ च्या शासन निर्णयान्वये क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनास सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशींपैकी ६८ शिफारशी तत्वत: मान्य करण्यात आल्या असून आरक्षणविषयक शिफारशीसह उर्वरित १४ शिफारशी अमान्य करण्यात आल्या आहेत. मातंग समाजाचा अनुसूचित जाती या प्रवर्गात समावेश आहे. घटनेच्या ३४१ व्या कलमानुसार अनुसूचित जातीच्या यादीत फेर बदल करण्याचे अधिकार केवळ केंद्र शासनास आहेत. राज्य शासनास त्यात कोणताही हस्तक्षेप करता येत नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

या विभागाच्या दि.३१/१२/२०११ च्या शासन निर्णयान्वये मान्य करण्यात आलेल्या शिफारशींबाबत शासनाच्या विविध विभागांकडून अंमलबजावणी करण्यात येत असून त्याबाबत विभागाकडून वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**शासनाने मुंबई पुणे व एक्सप्रेस वे वर एसटी महामंडळाच्या बसेस पथकरात सवलत देण्याबाबत तपासणी पूर्ण केली असून एसटी महामंडळाच्या बसेसना पथकरात सवलत देण्याबाबत**

**(३४) ४७११८ (२८-०४-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे या एक्सप्रेस वे वर एसटी महामंडळाच्या बसेस पथकरात सवलत देण्याबाबत तपासणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळ तोट्यात असून राज्यातील जनतेसाठी प्रवासाचे मुख्य साधन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मुंबई व पुणे या एक्सप्रेस वे वर एसटी महामंडळाच्या बसेस पथकरात सवलत देण्याबाबत तपासणी पूर्ण केली असून एसटी महामंडळाच्या बसेस पथकरात सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईपुणे या एक्सप्रेस वे वर एसटी महामंडळाच्या बसेस पथकरात सवलत देण्याबाबत तपासणी करुन शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करत आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०९-२०१६) :** (१) खरे आहे.

(२) एस.टी.महामंडळाच्या प्राप्त माहिती नुसार महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळ तोट्यात असून राज्यातील जनतेसाठी प्रवासाचे मुख्य साधन आहे.

(३) व (४) याबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**भंडारा जिल्हयात जात पडताळणीचे स्वतंत्र कार्यालय स्थापनेबाबत**

**(३५) ४७५६१ (२८-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात जात पडताळणीचे स्वतंत्र कार्यालय स्थापनेबाबत सचिव सामाजिक न्याय यांना मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१५ ला सुचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन स्तरावर कोणती कार्यवही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :**(१) होय.

शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि.९ जून २०१४ व दि.२ मार्च २०१५ अन्वये भंडारा जिल्हयासह एकूण ३६ जिल्हयात जात पडताळणी प्रमाणपत्र समित्या गठीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १ जून, २०१६ अन्वये जिल्हास्तरीय समित्यांकरीता विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांवरील ३१२ पदांपैकी ७६ पदे निरसीत करुन नव्याने ११५ पदे

निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर पदांवर अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्याकरिता पद भरतीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जात पडताळणीचे दाखले लवकर देण्याबाबत**

**(३६) ४७६५३ (२८-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जात पडताळणीचे दाखले ४-५ वर्षे झाली तरी विद्यार्थ्यांना मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असल्यामुळे मा.लोकप्रतिनिधी तसेच नागरीकांनी संबंधिताकडे जात पडताळणीचे दाखले लवकरात लवकर देण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येऊनही अद्यापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जात पडताळणीचे दाखले लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :** (१) नाही.
(२) जाती दाव्यांच्या काही प्रस्तावांमध्ये कागदपत्रांची कमतरता, अपुरे पुरावे यामुळे संबंधित व्यक्तीकडून पत्रव्यवहार करुन आवश्यक ते पुरावे मागवावे लागतात. शंकास्पद प्रकरणामध्ये पोलीस दक्षता पथकाकडून चौकशी केली जाते. त्यामुळे प्रकरणे निकाली काढण्यास उशीर होतो.

मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश तसेच सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ नुसार जातपडताळणी नियम २०१२ विहित करण्यात आले असून या नियमांनुसार जातप्रमाणपत्र देणे व त्याच्या जातपडताळणीचे कामकाज चालते. सदर नियमानुसार जातपडताळणी समितीस जातवैधतेबाबतचा निर्णय ३ महिन्याच्या अवधीत व अपवादात्मक परिस्थितीत २ महिन्याच्या जास्तीच्या कालावधीत देणे बंधनकारक आहे. प्रलंबित प्रकरणांची संख्या व अपुरा कर्मचारीवर्ग यांचा समन्वय साधून तसेच अतिरिक्त कार्यभार देऊन व वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीमध्ये राज्यात १५ विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत आहेत. या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचा कामाचा व्याप विचारात घेऊन समित्यांचे कामकाज प्रभावीपणे व्हावे, याकरिता दि.२/३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र समिती कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अपंगांसाठी तीन टक्के निधी राखीव ठेवला असताना त्यांना तो दिला जात नसल्याबाबत**

**(३७) ४८५४२ (२८-०४-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अपंगांसाठी तीन टक्के निधी राखीव ठेवला असताना त्यांना तो दिला जात नाही ही बाब माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अपंगांची नोकर भरती अनेक वर्षांपासून रखडली असून, सुमारे पंधरा हजार रिक्त पदांचा अनुशेष आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२५-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) अपंग अधिनियम, १९९५ मधील कलम ४० नुसार दारिद्रय निर्मुलन योजनांमधील लाभधारकांमध्ये किमान ३ टक्के अपंग लाभार्थी असणे आवश्यक आहे. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी ३ टक्के निधी राखून ठेवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने नगर विकास विभागाने दि. २८.४.२०१५ रोजी अपंगासाठी ३ टक्के निधी नागरी भागातील अपंगासाठी खर्च करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच ग्रामविकास विभागाने दि. २४.११.२०१५ रोजी अपंगाकरीता सामुहिक व वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या यादीसह मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्र. ३२९४/२०१०- निलिमा अनंत सुर्वे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने शासन सेवेतील अपंगांचा अनुशेष, पदोन्नतीमधील अनुशेष व अपंग कर्मचा-यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे यांचा पुरवठा याबाबत मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांकडून वेळोवेळी माहिती संकलीत करुन मा. उच्च न्यायालयास सादर करण्यात येत आहे. विविध प्रशासकीय विभागांकडून उपलब्ध माहितीनुसार राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सद्यस्थितीत एकूण १८५५४ अपंग अधिकारी/ कर्मचारी कार्यरत असून, माहे डिसेंबर, २०१० अखेर अपंगांची एकूण ५६३९ पदे रिक्त होती. त्यापैकी सद्यस्थितीत जवळपास २५७३ पदांचा अनुशेष शिल्लक असल्याचे दिसून येते.

अपंगांचा अनुशेष भरुन काढणेसाठी विशेष भरती मोहिम राबविणेबाबत यापूर्वी दि. ८.८.२०११ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर शासन परिपत्रकातील सूचना दिनांक २३.७.२०१५ च्या अर्थ शासकीय पत्रान्वये पुनक्षः सर्व विभागांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**श्रावणबाळ योजनेत झालेल्या गैर व्यवहाराबाबत**

**(३८) ४९१२१ (२८-०४-२०१६). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील सातेगाव तालुका अंजनगाव (सुर्जी) येथील श्री किसन गणेश वानखडे यांनी श्रावणाबाळ योजने अंतर्गत लाभ मिळविण्यासाठीचा विंनती अर्ज व संबंधित कागदपत्रांचा दस्ताऐवज दिनांक २६/६/२०१४ रोजी तलाठी कार्यालयामार्फत तहसील कार्यालय अंजनगाव (सुर्जी) येथे दाखल केलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सदर प्रस्ताव गहाळ झाल्याचे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये श्री किसन वानखडे यांच्या प्रस्तावा सोबत आलेले इतर प्रस्ताव मंजुर करुन संबंधीतांना अनुदानाचा लाभ मिळाल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मंजुर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये नियमबाह्य पध्दतीने म्हणजेच ज्यांची मुले शासकीय नोकरी करीत असताना सुध्दा सदर योजनेचा लाभ त्यांच्या कुटुंबियांना देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, श्री किसन वानखडे यांनी दाखल केलेल्या श्रावणबाळ योजने अंतर्गत दिलेल्या विंनती अर्जावर लाभ देण्यासंबंधी शासन उचित कारवाईचे आदेश देणार आहे काय,

(६) असल्यास, या सर्व प्रकरणात दोषींवर शासन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१६) :** (१) व (२) सदर प्रकरणाबाबतची कागदपत्रे तत्कालीन अव्वल कारकूल, संजय गांधी शाखा, तहसिल कार्यालय अंजनगाव सुर्जी यांनी संबंधीत तलाठी यांचेकडून घेतल्याचे व स्वाक्षरी करुन पोच दिल्याचे दिसून येते. परंतू, तहसिल कार्यालयातील संजय गांधी विभागातील नोंदवहीमध्ये या प्रकरणाच्या कागदपत्राची नोंद घेतल्याचे दिसून येत नाही.

(३) हे अंशतः खरे आहे

(४) नाही.

(५) प्रस्तुत अर्जदाराने कागदपत्रे सादर केल्यानंतर पात्र असल्यास लाभ देता येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई-बेंगलोर महामार्गावर कात्रज भागात महामार्गावर दरड कोसळून वाहनांचे मोठ्या प्रमाणावर अपघात होत असल्याबाबत**

**(३९) ४९५०४ (२९-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

**(१)** मुंबई-बेंगलोर महामार्गावर कात्रज भागात महामार्गावर दरड कोसळून वाहनांचे मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गाची देखभाल दुरुस्ती करणाऱ्या ठेकेदार कंपनीच्या बेजबाबदारपणामुळे तसेच प्राधिकरणामुळे वाहनांचे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याची शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्याअनुषंगाने सदर ठेकेदार कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०७-२०१६)** :(१) नाही.

अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार मुंबई-बेंगलोर महामार्गावर कात्रज भागात जानेवारी, २०१५ ते एप्रिल २०१६ मध्ये दरड कोसळल्यामुळे वाहन अपघात झालेले नाहीत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम जिल्ह्यात कर्ज वसूलीची संथगती, बँकांची उदासिनता आणि किचकट प्रक्रिया यामुळे ओबीसी महामंडळाच्या लाभार्थी उद्दिष्टपूर्तीही धोक्यात सापडली असल्याबाबत

**(४०) ४९७७२ (२८-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यात कर्ज वसूलीची संथगती, बँकांची उदासिनता आणि किचकट प्रक्रिया यामुळे ओबीसी महामंडळाच्या लाभार्थी उद्दिष्टपूर्तीही धोक्यात सापडली असल्याचे माहे जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओबीसी महामंडळाच्या लाभार्थ्यांची उद्दिष्टपूर्ती पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०७-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची वाशिम जिल्ह्याची वसुली संथगतीने आहे. २० % बीज भांडवल योजनेत माहे मार्च, २०१६ अखेर ३३ कर्ज प्रस्ताव बँकाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले असून त्यापैकी फक्त ०७ प्रकरणांस माहे, मार्च, २०१६ अखरे मंजूरी प्राप्त झाली आहे.

(२) महामंडळाच्या सर्व योजनांतर्गत प्रस्ताव दाखल करण्यासाठी व कर्ज वितरणासाठी अत्यंत सोपी व सोईस्कर प्रक्रिया राबविण्यात येते. महामंडळाच्या सर्व योजनांतर्गत उद्दीष्टपूर्तीसाठी दरमहा मुख्यालयात आढावा घेण्यात येतो. तसेच आढावा बैठकीचे नियोजन करुन त्याद्वारेही वसुली व उद्दीष्टपूर्तीसाठी निर्देश देण्यात येतात. बँकांकडे प्रस्तावित केलेल्या प्रकरणांत मंजूरीबाबत पाठपुरावा करण्यात येतो. लाभार्थीना दरमहा वसुलीसाठी भेटी देण्यात येऊन वसुलीचा पाठपुरावा करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघच्या तीन व सीआयआयच्या ४ कापूस खरेदी केंद्रावर कापसाची नगन्य खरेदी झाली असल्याबाबत**

**(४१) ४९७७३ (२७-०४-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघच्या तीन व सीआयआयच्या ४ कापूस खरेदी केंद्रावर केवळ अनुक्रमे ८ शेतकऱ्यांच्या १३५ क्विंटल व १९ हजार २३६ क्विंटल कापसाची नगन्य खरेदी झाली असे माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) याच कालावधीत खाजगी व्यापाऱ्यांनी शेतकऱ्याकडून २ लाख ९३ क्विंटल कापसाची खरेदी केली असे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्याकडून कापूस खरेदीसाठी आवश्यक केंद्र व खरेदी केलेल्या कापसाची रक्कम देण्याबाबत सुलभतेने व्यवहार व्हावा यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

हंगाम २०१५-१६ मध्ये नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाच्या ३ केंद्रावर डिसेंबर, २०१५ अखेर १५२ क्विं. कापसाची खरेदी तर सीसीआयच्या ४ कापूस खरेदी केंद्रावर ३७१८८ क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे.

(२) डिसेंबर, २०१५ अखेर नांदेड जिल्ह्यामध्ये खाजगी व्यापाऱ्यांनी एकूण ४.२९ लाख क्विं. कापसाची खरेदी केलेली आहे.

(३) नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाचे ३ व भारतीय कपास निगचे ४ कापूस खरेदी केंद्र सुरु करण्यात आले होते. सदर खरेदी केंद्रावर कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून हमी दरावर खरेदी केलेल्या कापसाची रक्कम महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने तसेच भारतीय कपास निगमने आरटीजीएस द्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा केलेली आहे. तसेच जेथे RTGS शक्य नाही, तेथे चेकने रक्कम देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोंभूर्णा तालुक्यात (जि.चंद्रपूर) असुविधा कापूस खरेदी केंद्र सुरु करणेबाबत**

**(४२) ५०१६५ (२७-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभूर्णा तालुक्यात (जि.चंद्रपूर) असुविधा कापूस खरेदी केंद्र सुरु करणेबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यांनी या संदर्भात पणन, सहकार मंत्री व पालकमंत्री यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) खुल्या बाजारात खाजगी व्यापारी हमी दरापेक्षा कापसाला जास्त किंमत देत असल्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ व भारतीय कपास निगमच्या कापूस खरेदी केंद्रावर कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा अत्यल्प प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे पोंभूर्णा तालुक्यात असुविधा केंद्र सुरु करण्यात आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडेगाव (जि.भंडारा) येथील अशोक लेलेंड कारखान्यासाठी जमीन दिलेल्यांना कारखान्यात नोकरी देण्यात आली नसल्याबाबत**

**(४३) ५०३६४ (२७-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील गडेगावस्थित अशोक लेलेंड कारखान्यासाठी जमीन दिलेल्यांना कारखान्यात नोकरी देण्यात आली नाही व जमीन घेतेवेळी दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शेतक-यांच्या पाल्यांना संकटाना सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कारखान्याला ३५ वर्षे पुर्ण झाली असूनही शेतक-यांना व कामगारांना न्याय मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कारखाना व्यवस्थापक अरविंद बोराटकर हे मंजुरांकडून कमी रुपयात राबवून घेत आहेत व शासकीय दरानुसार त्यांना मजूरी देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जमीनीचा उपयोग होत नसेल तर कंपनीने भूमीहीन शेतक-यांना जमीन परत करावी असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असताना कारखान्याने १ हजार हेक्टर जागा पडीत ठेवली असून त्या ठिकाणी सागवानाची झाडे लावली असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर कारखान्यांवर व व्यवस्थापक यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे वा करीत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-०८-२०१६) :**(१) गडेगाव स्थित अशोक लेलेंड कारखान्यामध्ये स्थालोरो प्रपत्रानुसार पर्यवेक्षकीय १३१ व इतर ५२६ असे एकूण ६५७ लोक कार्यरत असून स्थानिक रोजगाराची टक्केवारी ९५.८९ टक्के आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) अशा प्रकारची कोणतीही तक्रार जिल्हा उद्योग केंद्राकडे प्राप्त झाली नसून कारखान्यास २३३.५७ एकर जमीन दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टीवर देण्यात आली असून त्यावर जड वाहन जुळवणी करण्याचे उत्पादन सुरु आहे. कारखान्याने १३ हे. जमीन भविष्यातील विस्ताराकरिता राखीव ठेवली असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उद्दिष्टाप्रमाणे काही जागेवर झाडे लावण्यात आली आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सावरखेड (ता. मोर्शी,जि.अमरावती) येथील विश्रामगृहाचे नुतनीकरण करण्याबाबत

**(४४) ५०३७४ (२९-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावरखेड (ता. मोर्शी,जि.अमरावती) येथील ब्रिटीशकालीन विश्रामगृहाचे नुतनीकरण करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना रु. १.५० कोटी निधी मंजूर करण्याबाबतचे निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विश्रामगृहात कोणत्याही मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे येणाऱ्या अतिमहत्वाच्या व्यक्ती व अधिकारी यांची अत्यंत गैरसोय होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०८-२०१६) :**(१) आमदार (तिवसा), जिल्हा अमरावती यांचे पत्र प्राप्त आहे.
(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

सावरखेड (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील विश्रामगृहाचे अतिरिक्त सूटचे बांधकाम करण्याबाबतचे प्राथमिक अंदाजपत्रकास उपलब्ध निधी व निकषांचे अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**सांगली जिल्हयातील माणगंगा साखर कारखाना रोडवर असलेल्या मुलींच्या वसतीगृहात माहिला अधिक्षक व सुरक्षा रक्षक यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४५) ५१०६४ (२८-०४-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील आटपाडीपासून ३ कि.मी. वर असलेल्या माणगंगा साखर कारखांना रोडवर असलेल्या नुतन मुलींच्या वसतिगृहात महिला अधिक्षक व महिला सुरक्षा रक्षक यांची पदे रिक्त असल्याने मुलींच्या वसतिगृहातील पुरुष अधिक्षक तसेच, पुरूष सुरक्षा रक्षक मुलींच्या वसतिगृहात कार्यरत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहात सोलर सिस्टीम बंद असणे, ड्रॅनेज लाईन बंद असणे, संरक्षक भितींला अनेक ठिकाणी भगदाडे पडलेले असणे, उपहारगृहात कच्च्या चपात्या बेचव भाजी आणि डाळ नसलेली आमटी इ. खाद्यपदार्थ मुलींना नाईलाजाने खावे लागणे इत्यादी असुविधा निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतीत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) वसतिगृहाच्या अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य वसतीगृहाच्या महिला अधिक्षकांकडे सोपविण्यात आलेला असून महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याची कार्यवाही सुरु आहे. वसतीगृहांतील असुविधांबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूरचे नऊ टोलनाके कायमस्वरुपी बंद करण्याबाबत**

**(४६) ५१५४८ (२९-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरचे नऊ टोलनाके कायमस्वरुपी बंद करण्याचा व कार्यकर्त्यांवरील गुन्हे काढून घेण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवडयात वा त्यासुमारास घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम व रस्ते विकास महामंडळाच्या १० रस्त्यावरचे सुरु असलेले टोल बंद करण्याचा व आंदोलकावरील गुन्हे काढून टाकण्याचा निर्णय शासन घेणार काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१०-२०१६)** :(१), (२), (३) व (४) कोल्हापूरचे नऊ टोलनाके कायमस्वरुपी दिनांक ०१.०१.२०१६ पासून बंद करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २३.१२.२०१५ रोजी घेतला आहे.

तथापि, टोल नाके बंद करण्यासंदर्भात गुन्हे दाखल झालेल्या कार्यकर्त्यांवरील गुन्हे काढून टाकण्याबाबत गृह विभागाच्या धोरणानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नाशिक शहरातील संजय गांधी निराधार योजनेचे सन २०११ पासून अनुदान बंद असलेबाबत**

**(४७) ५२०२५ (२८-०४-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील निराधार व अत्यल्प उत्पन्न असलेल्या नागरीकांना शासनामार्फत संजय गांधी निराधार योजनेतून मिळणारे अनुदान सन २०११ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असलयास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर योजनेतील अनुदान सुरू करणेची मागणी नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संजय गांधी निराधार योजनेतील अनुदान सूर करण्याबाबत शासने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१६)** :(१) नाही.

तहसिलदार संजय गांधी योजना नाशिक महानगरपालिका क्षेत्र या कार्यालयाकडून विशेष सहाय्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमहा अनुदान वितरीत करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला येथील राज्य वखार महामंडळाच्या हमालांच्या वेतनात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४८) ५३४६२ (२७-०४-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील राज्य वखार महामंडळाच्या हमालांच्या वेतनात घोटाळा झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील २०० कोटी रुपयांच्या आतील रस्ते प्रकल्पांना टोलमुक्त करण्याबाबत

**(४९) ५५७१४ (२४-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २०० कोटी रुपयांच्या आतील रस्ते प्रकल्पांना टोलमुक्त करण्यात आलेले आहेत व मोठ्या वाहनाना टोल द्यावाच लागणार असून याबाबतचे नवे पारदर्शक धोरण राबविण्यासाठी बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,
(३) तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१६)** :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
२०० कोटी पेक्षा कमी किंमतीचे व ज्या पथकर स्थानकांचा कालावधी पूर्ण होत आला आहे, अशी पथकर स्थानके बंद करण्यात आली आहेत तसेच दिनांक ०१/०६/२०१६ पासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील सर्व पथकर स्थानकावर कार, जीप व हलकी वाहने तसेच एस.टी. व स्कुल बसेस यांना पथकरातून सुट देण्यात आली आहे. तसेच पथकर वसुलीत पारदर्शकता असावी यासाठी सर्व पथकर स्थानकावरील पथकर वसुली संगणीकृत पध्दतीने करण्यात आली असून सदर वसूलीची Real Time माहिती सर्वांना उपलब्ध होईल, याचे नियोजन करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहनांची संख्या ४० टक्के कमी दाखवून कंत्राटदाराने काही पटीत टोल वसुल केल्याबाबत

**(५०) ५६२०३ (२४-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहनांची संख्या ४० टक्के कमी दाखवून कंत्राटदाराने काही

पटीत टोल वसुल केल्याचे राज्य रस्ते विकास महामंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर केलेल्या आकडेवारी दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोल वसुलीचे उद्दीष्ट मुदतीपुर्वीच पुर्ण होत असल्याने कंत्राटदाराला माहे डिसेंबर २०१६ नंतर २७ महिन्यांच्या कालावधीसाठी दरमहा ४० कोटी रुपये अतिरिक्त उत्पन्न मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे-मुंबई जुन्या महामार्गावरही कंत्राटदाराला माहे जुन, २०१७ नंतर २१ महिन्यांच्या कालावधीत अतिरिक्त ३५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन याची चौकशी करणार आहे काय, तसेच एक्सप्रेस वेवर चारचाकी आणि एस.टी. बस गाड्यांना सुट देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१०-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) मुंबई पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई एन्ट्री पॉईंट या दोन ठिकाणच्या पथकर नाक्यांवर हलक्या वाहनांना सूट देण्याबाबत वित्तीय व कायदेशीर बाबी तसेच सुसाध्यता तपासून अहवाल सादर करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (सा.बां.) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल शासनास दि.२८.०४.२०१६ रोजी सादर केला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.